# जिल्हा परिषद, सांगली

## कृषी विभाग मार्फत केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून राबविणेत येणा-या सन 2024-2025 मध्ये शेतक-यांच्या योजना

| अ. क्र | योजना | योजनेची माहिती, निकष व आवश्यक कागदपत्रे | कार्यान्वयीन यंत्रणा/संपर्क कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जातीच्या शेतकरी लाभार्थी यांचेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना / अनुसूचित जमातीच्या शेतकरी लाभार्थी यांचेसाठी बिरसा मुंडा कृषी स्वावलंबन योजना | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मंडा कृषी क्रांती योजनेतंर्गत खालील दिलेल्या घटकांचा लाभ देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत -<br>1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना - नवीन विहीर (4,00,000/-), जुनी विहीर दुरुस्ती (1,00,000/-), इनवेल बोअरिंग (40,000/-), पंप संच (40,000/-), वीज जोडणी आकार (20,000/-), शेततळयांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण (2,00,000), सुक्ष्म सिंचन संच (ठिबक - 97000/- तुषार- 47000/-), पीव्हीसी/एचडीपीई पाईप - (50000/-), पंपसंच (डिझेल / विदयुत - 40000/-), सोलर पंप - (50000/-) परसबाग (5000/-), यंत्र सामग्री - (बैलचलित व ट्रॅक्टरचलित अवजारे - 50000/-), असे महत्तम अनुदान<br>2) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना - नवीन विहीर (4,00,000/-), जुनी विहीर दुरुस्ती (1,00,000/-), इनवेल बोअरिंग (40,000/-), पंप संच (40,000/-), वीज जोडणी आकार (20,000/-), शेततळयांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण (2,00,000), सुक्ष्म सिंचन संच (ठिबक - 97000/- तुषार- 47000/-), पीव्हीसी/एचडीपीई पाईप - (50000/-), पंपसंच (डिझेल / विदयुत - 40000/-), सोलर पंप - (50000/-) परसबाग (5000/-), यंत्र सामग्री - (बैलचलित व ट्रॅक्टरचलित अवजारे - 50000/-), विंधन विहीर - 50000/- असे महत्तम अनुदान<br>1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतंर्गत लाभार्थी शेतकरी हा अनुसूचित जाती व नवबौध्द असला पाहिजे व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतंर्गत लाभार्थी शेतकरी हा अनुसूचित जमातीचा असला पाहिजे व त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचेकडून जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.<br>2) ज्या शेतक-यांना नवीन विहीर या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे. त्यांच्यासाठी किमान 0.40 हेक्टर ते कमाल 6 हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे<br>3) शेतक-यांच्या नावे जमीनधारणेचा 7/12 दाखला व 8 अ उतारा असणे आवश्यक आहे (नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्राबाहेरील)<br>4) लाभार्थ्यांकडे स्वत:चे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.<br>5) लाभार्थ्याचं बॅंक खाते असणे व सदर बॅंक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.<br>6) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतंर्गत स्वर्गीय कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभीमानी योजनेतंर्गत जमीन वाटप झालेल्या शेतकज्यांना या योजनेचा प्राधान्याने लाभ | 1) कृषि विभाग, जिल्हा परिषद, सांगली.<br>2) कृषि विभाग, पंचायत समिती<br>3) https://mahadbtmahait.gov.in |

# जिल्हा परिषद, सांगली

## कृषी विभाग मार्फत केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून राबविणेत येणा-या सन 2024-2025 मध्ये शेतक-यांच्या योजना

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्यात येईल.<br>7) बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतंर्गत परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम 2006 नुसार वनपटटेधारक शेतकऱ्यांची या योजनेतंर्गत प्राधान्याने लाभार्थी म्हणून निवड करणेत येईल.<br>8) नवीन विहीर या बाबींची मागणी असणाऱ्या लाभार्थीच्या 7/12 वर व प्रत्यक्षात विहीर नसावी<br>9) सामूहिक शेत जमीन किमान 0.40 हेक्टर धारण करणारे एकत्रित कुंटुंब नवीन विहीर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र असेल<br>10) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्रा आवश्यक आहे.<br>11) नवीन विहीर या बाबींची मागणी असणाऱ्या शेतकऱ्यांनी यापूर्वी राज्य शासन व जिल्हा परिषदेच्या निधीतून सिंचन विहीर या सुविधेचा लाभ घेतलेला नसावा.तरी सदर पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचे महाडिबीटी पोर्टलच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर मागविण्यात येत असून जिल्हयाच्या प्राप्त लक्षाकांच्या मर्यादेत प्राप्त अर्जाची ऑनलाईन सोडत काढण्यात येईल. सोडतीनंतर पात्र लाभ्यार्थ्यांना अनुदान अदा करणेची कार्यवाही ऑनलाईन करणेत येईल याची नोंद घ्यावी. | |
| 2 | नविन राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम | नविन राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना असून महाराष्ट्र शासनाने सदर योजना पर्यावरण संतुलन, ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान उंचाविणेचा दृष्टीकोन ठेवून इको व्हिलेज योजनेत समाविष्ठ केला आहे. उर्जा शक्तीची काटकसर करणे व इंधनाचे पर्यायी साधन उपलब्ध करुन देणे तसेच प्रदुषण टाळण्यासाठी बायोगॅस हा एक चांगला पर्याय आहे.<br>1) बायोगॅस उभारणीसाठी केंद्र शासनाकडून 2 ते 6 घ.मि.साठी खुल्या प्रवर्गासाठी 14350/- व अनुसूचित जाती व जमातीसाठी 22000/- प्रति बायोगॅस अनुदान दिले जाते<br>2) शौचालय जोडणी केल्यास अतिरिक्त रु.1600/- अनुदान दिले जाते.<br>3) जिल्हा परिषद स्वीय निधीमधून पुरक अनुदान प्रति बायोगॅस 10000/- रु राहील. | 1) कृषि विभाग, जिल्हा परिषद, सांगली.<br>2) कृषि विभाग, पंचायत समिती |
| 4 | शेतकरी मासिक योजना | कृषि व संलग्न विषयाशी निगडीत माहिती, आधुनिक कृषि तंत्रज्ञान, कृषि संशोधन इ.बाबतची उपयुक्त माहिती असलेले शेतकरी मासिक पुस्तिका शासनाचे कृषि विभागामार्फत प्रकाशित करण्यात येते. सदर मासिकाची वार्षिक वर्गणी रु. 400/- इतकी आहे.<br>वर्गणी पाठविण्याचा पत्ता :- संपादक, शेतकरी मासिक, कृषि आयुक्तालय, कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे-5 | 1) कृषि विभाग, जिल्हा परिषद, सांगली.<br>2) कृषि विभाग, पंचायत समिती |

**जिल्हा परिषद, सांगली**

**कृषी विभाग मार्फत केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून राबविणेत येणा-या सन 2024-2025 मध्ये शेतक-यांच्या योजना**